महाराष्ट्र पोलीस
सद्रक्षणाय खलनिग्रहणाय

पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस. मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ 928 /२०२४ दि. 12/०७/२०२४

## "वाहतूक नियंत्रण अधिसुचना"

**ज्याअर्थी, कापूरबावडी** वाहतूक उपविभागाचे हद्दीत कोलशेत, ढोकाळी परिसरात निवासी संकुलांची झपाटयाने वाढ होत आहे. त्यामुळे नळपाडा सिग्नल येथून कोलशेतकडे जाणाऱ्या वाहनांची संख्या मोठया प्रमाणात आहे. सदर मार्गावरील नळपाडा सिग्नल ते डी मार्ट पर्यंत टेक्सोन कंपनी, बुकर सेल्स, झुडिओ, दिव्या स्नॅक्स अशी व्यावसायिक संकुले आहेत. सदर ठिकाणी खरेदी करीता येणारे वाहनधारक आपले वाहन मुख्य रस्त्यावर पार्क करीत असल्याने सदर ठिकाणी वाहतूक कोंडी होत असते. सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी, मी डॉ. विनयकुमार मे. राठोड, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे. :–

- **पी १ व पी २ व्यवस्था करण्यात येणारे ठिकाण :–**

| अ.क्र. | ठिकाण | प्रकार | अंतर | वेळ |
|---|---|---|---|---|
| १ | बृहन्मुंबई पाणी पुरवठा विभाग कार्यालय नळपाडा लगत असणारा नाला ते दिव्या स्नॅक्स कॉर्नर पावेतो | पी १ पार्किंग | १५० मीटर | २४ तास |
| २ | दिव्या स्नॅक्स कॉर्नर ते बृहन्मुंबई पाणी पुरवठा विभाग कार्यालय नळपाडा लगत असणारा नाला पावेतो | पी २ पार्किंग | १५० मीटर | २४ तास |

सदर अधिसूचना प्रसिध्द झाल्या तारखेपासून ३० दिवसाच्या प्रायोगिक तत्वावर लागू करण्यात येत असून कोणाची काही हरकत असल्यास त्या लेखी स्वरुपात पोलीस उप आयुक्त कार्यालय, वाहतूक विभाग, तीन हात नाका, ठाणे ४००६०२ येथे पाठवाव्यात. या बाबत काही सुचना आक्षेप प्राप्त न झाल्यास सदर अधिसूचना कायम स्वरुपात अंमलात राहील.

सदर वाहतूक नियंत्रण अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका, ग्रीन कॉरीडोर, ऑक्सीजन गॅस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

( डॉ. विनयकुमार मे. राठोड )
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे
२/– सदर अधिसूचनेस प्रसिध्दी देणेस विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सविनय सादर,**

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. जिल्हाधिकारी, ठाणे
मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे

CamScanner

मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे
प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे
पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–५ वागळे इस्टेट, ठाणे
पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा, ठाणे
पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे शाखा, ठाणे
परिवहन व्यवस्थापक, ठाणे महानगरपालिका, ठाणे
विभाग नियंत्रण कक्ष, राज्य परिवहन विभाग, ठाणे
नियंत्रण कक्ष, ठाणे शहर
ठाणे पोलीस पत्रक

<u>प्रत</u> :– समन्वय अधिकारी ९ ए. एस. कक्ष, ठाणे
२/– सदर अधिसूचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी

**<u>प्रत माहिती व कार्यवाहीसाठी,</u>**
स.पो.आ. ठाणे वाहतूक विभाग,/पोनि कापुरबावडी, वागळे, राबोडी वाहतूक उप विभाग.
२/– म.न.पा.ठाणे च्या संबंधीत अधिका–यांकडून आवश्यक सूचना फलके लावून घ्यावीत.

CamScanner